# उल्हासनगर महानगरपालिका

**मालमत्ता कर विभाग**

**मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र**

Tel No:- 95251-2720116 /125 Ext. No. 238 Fax No:- 95251-2720104


जा. क्र. उमपा/कर विभाग/यु ४/ २e /२०२३

दिनांक ८ जुन २०२३

## अंतिम सुचना

**विषय :-जप्ती/अटकावणी केलेली स्थावर मालमत्ता ताब्यात घेणेबाबत**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात खालील मिळकतीपोटी मालमत्ता कर थकबाकी असल्याने कर वसुलीकामी सदर मालमत्तेची जप्ती/अटकावणी करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने थकबाकी रक्कम भरणा करणेसाठी आपणांस २१ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. तरीही आपण थकबाकी भरणा केलेली नाही. त्याचे परिणाम स्वरुप सदर मिळकतीची विक्री करणेसाठी स्थानिक/जिल्हास्तरीय/राज्यस्तरीय वर्तमानपत्र तसेच महानगरपालिका संकेतस्थळ व महानगरपालिका सुचनाफलक इ ठिकाणी लिलावाची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. **त्यास कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नसल्यामुळे रक्कम रु १/- नाममात्र बोली लावणे व मालमत्ता ताब्यात घेणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ कराधान नियम यामधील नियम ४७ तसेच प्रशासकीय ठराव क्र. १५ दिनांक १९ मे २०२३ अन्वये कर निर्धारक व संकलक यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.**

| अ.क्र | कर देण्यास प्रथम पात्र असलेले व्यक्तीचे नाव | मिळकतीचा पत्ता | कर आकारणी पुस्तकाप्रमाणे मालमत्ता क्रमांक | बांधकाम प्रकार | अंदाजित क्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | दयानंद डी शेटटी | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, दुसरा मजला, शॉप नं. २०८, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७५३०० | आरसीसी | ४०२ |
| २ | व्होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, तिसरा मजला, शॉप नं. ३०२, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७५६०० | आरसीसी | १७३ |
| ३ | व्होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, तिसरा मजला, शॉप नं. ३०४, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७५८०० | आरसीसी | १७५ |
| ४ | बुलचंद निहालचंद | प्लॉट नं. २३, विकास नर्सिंग होम समोर, हुकूमतराय अपार्टमेंट, सातवा मजला, प्लॅट नं. ४० व ४१ उल्हासनगर-३ | २७बीआय००४९२६८०० | आरसीसी | ७४२ |
| ५ | व्होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, पहिला मजला, शॉप नं. १०२, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७३६०० | आरसीसी | २१६ |
| ६ | व्होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, तिसरा मजला, शॉप नं. ३०६, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७६००० | आरसीसी | २०९ |

त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ कराधान नियम यामधील नियम ४७ मधील महत्वाच्या बाबींकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

**नियम ४७ (६)** वर सांगितल्याप्रमाणे स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात आल्यानंतर आयुक्ताने, खरेदीदार म्हणुन जाहीर करण्यात आलेल्या व्यक्तीस तिचा कब्जा दिला पाहिजे आणि तिला, प्रमाणपत्रात नमूद केलेली मालमत्ता तिने खरेदी केली आहे, अशा अर्थाचे प्रमाणपत्र दिले पाहिजे.

**नियम ४७ (७)** विक्रीसाठी काढलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, महानगरपालिकेच्या वतीने, आयुक्ताने नाममात्र बोली बोलणे कायदेशिर असेल परंतु अशा रीतीने बोली बोलण्यासाठी स्थायी, समितीची पूर्वमान्यता मिळवण्यात आली पाहिजे.

**नियम ४७** (८) पोट-कलम (६) ला अनुसरुन केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत जी व्यक्ती आयुक्तास अडथळा करील अशा कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याकडून अशा स्थावर मालमत्तेतून बाहेर काढण्याविषयी आयुक्तास निर्देश देता येईल आणि त्यास, उक्त मालमत्तेत प्रवेश करण्यासाठी आवश्यक असेल अशा बळाचा वापर करता येईल.

**यास्तव संबंधितांना पुन्हा अंतिम सुचित करण्यात येते की, सदर मालमत्तेमधील सर्व जंगम साहित्यासह सदरची मालमत्ता ७ दिवसांत खाली करावी. अन्यथा नियम ४७ (८) अंतर्गत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

(जेठानंद ता करमचंदानी)

कर निर्धारक व संकलक

उल्हासनगर महानगरपालिका